# सामाजिक शास्त्र संशोधनात शैक्षणिक ग्रंथालयाची भूमिका

डॉ. जी.पी. उरकुंदे
ग्रंथपाल
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

## प्रस्तावना

सामाजिक संशोधन ही बौद्धिक प्रकिया आहे. संशोधनामुळे उपलब्ध असलेल्या ज्ञानाचा शोध घेऊन ज्ञानामध्ये भर टाकली जाते. उपलब्ध असलेल्या ज्ञानाचे पुन:परीक्षण केले जाते. आणि साहित्याची समीक्षा करून ज्ञानात भर टाकली जाते. संशोधन ही सतत चालणारी प्रकिया आहे. संशोधनाच्या संदर्भात Systematized effort to gain New Knowledge असे म्हटले जाते.

☐ शिक्षणाचा प्रसार आणि संशोधनामुळेच समाज, राष्ट्र आणि मानवाचा विकास होण्यास मदत होते. सुसंस्कृत समाज निर्मितीसाठी शिक्षण आणि संशोधन या गोष्टी दोन्ही आवश्यक आहेत.

☐ शिक्षण आणि संशोधनाचे कार्य सफल होण्यासाठी वाचनीय साहित्य उपलब्ध होणे गरजेचे आहे. या गरजेतूनच ग्रंथालय आणि संशोधनाची निर्मिती झाली आहे. गरज ही शोधाची जननी होय. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ग्रंथालये ही वाचनीय साहित्य उपलब्ध करून देशाबरोबरच ज्ञानाचे ग्रंथरूपाने जतन करत असतात. संशोधकाला संशोधन कार्यात मदत करणारी यंत्रणा म्हणून ग्रंथालये ही आधुनिक स्वरूपात कार्य करीत आहेत.

माहिती व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात बदलत्या घडामोडीचे आधुनिक तंत्रज्ञान संशोधकांना पुरविण्यासाठी ग्रंथालये सज्ज आहेत. सामाजिक संशोधनाद्वोर आधुनिक परिस्थतीची व संस्थेची परिपूर्ण ओळख करून देण्यासाठी ग्रंथालये ही समाजाभिमुख झाल्याचे दिसून येत आहे.

## सामाजिक शास्त्र संशोधनाची व्याख्या

सामाजिक संशोधन म्हणजे सामाजिक संशोधनाबाबत नवीन माहिती शोधण्यासाठी किंवा जुन्या माहितीचे परीक्षण करण्यासाठी त्या ज्ञानातील अनुक्रम, परस्पर संबंध, कार्यकारण संबंध याविषयी स्पष्टीकरण व सामान्यीकरण प्रस्थापित करण्याची प्रक्रिया होय. – पी.व्ही.चंग

सामाजिक संशोधन ही सामाजिक जीवनाचे अध्ययन, विश्लेषण आणि संकल्पनी करण्याची एक पद्धत आहे. ज्यामुळे ज्ञानाची वृध्दी शुद्धीकरण किंवा पुनर्परीक्षण होऊ शकेल. मग ते ज्ञान एका सिद्धांतांची रचना करण्यास किंवा एका कलेस व्यवहारात करण्यास सहाय्यक ठरू शकेल. – स्लेसिंजट व स्टिफेनसन.

## सामाजिक संशोधनाचे उद्देश (Objectives of Social Science Research)

सामाजिक संशोधनाचा हेतू किंवा उद्देश, मानवी समाज मानवाचे समाजजीवन, त्यावर प्रभाव टाकणोर घटक आणि परिणाम यांच्याशी संबंधित असतो. सामाजिक संशोधनातून वेगवेगळ्या समस्यांचा अभ्यास केला जातो.

१. सामाजिक घटकांचा अभ्यास.
२. परस्पर संबंधाची उकल करणे.
३. नवनवीन ज्ञानाचा शोध घेणे.
४. जुन्या ज्ञानाची पुनर्मांडणी करणे.
५. सामाजिक जीवनकाळात नविन दृष्टिकोन अंगीकारणे.
६. सामाजिक नियंत्रण.

सामाजिक संबंध आणि प्रक्रिया, क्रिया आणि प्रतिक्रिया आणि विघटन प्रकृतीबाबत माहिती गोळा करणे, विश्लेषण करणे, प्रभावी उपाययोजना करणे आणि त्याद्वोर सामाजिक नियंत्रण प्रस्थावीत करण्यासाठी सामाजिक संशोधन उपयुक्त ठरते.

## संशोधन प्रक्रिया

संशोधन हे वेगवेगळया विषयाअंतर्गत चालू असणोर कार्य आहे. संशोधन हे शास्त्रीय पध्दतीने पूर्ण करण्यासाठी आणि संशोधनाचे निष्कर्ष हे संशोधनाच्या चौकटीतच राहण्यासाठी संशोधकाने संशोधन कार्य सरू करण्यापूर्वी संशोधन प्रक्रियेचा आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

संशोधनामध्ये Design या शब्दाचा अर्थ Drawing an outline or planning or arranging details असा घेतला जातो तर Research Design चा अर्थ **Planning a strategy of conducting research** असा आहे. संशोधन आराखडयामुळे संशोधनात सुसूत्रता निर्माण होते आणि संशोधन प्रक्रियेत गती प्राप्त होते. यासाठी संशोधन प्रक्रियेला महत्व प्राप्त झाले आहे.

## संशोधन प्रक्रियेतील महत्वाचे घटक

संशोधन ही अनेक टप्पे असणारी प्रक्रिया आहे. यामध्ये पुढील बाबीचा प्रामुख्याने समावेश करावा लागतो.

१. संशोधनाचा विषय
२. संशोधन संस्थेची निवड
३. संशोधनाची पार्श्वभूमी
४. संशोधनाचे उद्देश
५. संशोधनाची गृहितके
६. माहितीचे संकलन आणि विश्लेषण करणे.
७. अहवाल लिहिणे.

## संशोधनात ग्रंथालयाची भूमिका

आजच्या आधुनिक युगात सामाजिक संशोधनामध्ये संशोधन करीत असताना नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत गरजेचा झाला आहे. कठीण प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग संशोधकांनी करणे आवश्यक आहे. संगणकाचा वापर करून बऱ्याच माहिती व आकडेवारीचे वर्गीकरण, सारणीकरण करून विश्लेषण करावे लागते.

आजच्या आधुनिकतेच्या युगात ग्रंथालये व माहिती केंद्रे ही वाचनीय साहित्य विकसित करीत असतात. ग्रंथालये ही वाचन साहित्याच्या रूपाने संशोधकाना तसेच उपभोक्त्यांना गरजांची पूर्ती होईल अशी माहिती पुरवित असतात. ग्रंथालये ही संशोधकांना गुणवत्तापूर्ण वाचनीय साहित्याचा पुरवठा करत असतात. ग्रंथालयातील सेवा अधिक परिणामकारकपणे होण्यासाठी विविध स्तरावरील शैक्षणिक ग्रंथालये, उदा. महाविद्यालयीन ग्रंथालये, विद्यापीठ स्तरावरील ग्रंथालये, विशेष ग्रंथालये परिपूर्ण माहितीने सज्ज झालेली आहेत. ग्रंथालयात येणारा वाचक, संशोधक हा ग्रंथालयातून हवी असलेली माहिती मिळावी या अपेक्षेने येत असतो. यासाठी आधुनिक काळातील ग्रंथालयीन माहितीची साठवणूक करून संशोधकांना माहिती पुरविण्यासाठी सज्ज असली पाहिजेत. संशोधन हे कोणत्याही प्रकारचे असो त्या संशोधकांना उपयुक्त असलेली माहिती देणे हे ग्रंथालयाचे आद्यकर्तव्य आहे.

संशोधनामध्ये ग्रंथालयाची भूमिका ही महत्त्वपूर्ण आहे. संशोधक हा माहिती शोधण्यासाठी ग्रंथालयावरच अवलंबून असतो, त्यासाठी ग्रंथालयानी वाचनीय साहित्याचे वर्गीकरण करून वाचकांना/संशोधकांना माहिती उपलब्ध करून दिली जातात.

सामाजिक शास्त्र संशोधनात उपभोक्त्यांना परिणामकारकपणे सेवा देण्यासाठी ग्रंथालयात ई—बुक्स ही जर्नल, विश्वकोष, संदर्भ ग्रंथ इत्यादी माध्यमाचा समावेश असणे गरजेचे आहे. ग्रंथालयात कोणकोणत्या स्वरूपाची नियतकालीके आहेत, वर्तमानपत्रे आहेत, कॉन्फरन्स प्रोसिडींग आहत याची संशोधकांना जाणीव करून देणे गरजेचे आहे. ग्रंथालयाने ग्रंथालयात असणारी सामाजिक शास्त्राविषयीची साधने संशोधकांना उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. पुढील बाबीसाठी ग्रंथालयात संशोधन करण्यासाठी आवश्यकता आहे.

१. माहितीची साधने विकसित करण्यासाठी.
२. संशोधकांना /उपभोक्त्याला परिपूर्ण माहिती मिळवून देण्यासाठी.
३. सिद्धंत तत्वे विकसित करण्यासाठी.

४.	येणाऱ्या बदलास सामोरे जाण्यासाठी.
५.	संशोधकात/उपभोक्त्यास असणोरे नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी.

## निष्कर्ष

सामाजिक संशोधन हे सामाजिक विकासाचे प्रेरणास्थान आहे. अज्ञान दूर करण्यासाठी, सामाजिक प्रगतीसाठी, सामाजिक कल्याणाकरीता, सामाजिक नियोजन व नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी सामाजिक संशोधन अतिशय महत्त्वाचे आहे. सध्याच्या युगात शैक्षणिक ग्रंथालये संशोधकांना विविध स्वरूपाची माहिती पटवून संशोधनाच्या कार्यात सतत मदत करीत आहेत. सामाजिक संशोधनात माहिती पुरवित असताना विविध माध्यमाचा वापर करून संशोधकांना, समाजात माहिती सेवा देण्याचे कार्य ग्रंथपालास करावे लागते. ग्रंथालयामध्ये माहिती साक्षरता सारखे अभियान राबवून वाचकांना, संशोधकाला माहिती पुरविण्याचे कार्य ग्रंथालये करीत आहेत. त्यामुळेचे सामाजिक शास्त्रासारख्या विस्तृत विषयात ग्रंथालयाची भूमिका फार महत्त्वपूर्ण आहे.

## संदर्भ सूची


1.	Information competency standards for Higher education : Association of collage and Research Librarian 2000 Chicago
२.	बोधनकर, सुधीर आणि अलोणी विवेक, सामाजिक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन, नागपूर,—१३
३.	कायंदे पाटील गंगाधर, संशोधन पध्दती, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक—१३
४.	कुमार राजेंद्र, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे—२०१३.


❖❖❖